
# स्वाध्याय माला



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा.
दा.क्र. १५४४

BVBK-0401544

वाचनालय
बा. वा.
१५४४
१५।४।८३

स्वाध्यायमाला : पुष्प २०७ वे

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# कार्तिक मास

अ. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय वि.
बा. क्र. १५४४ दिनांक १५।४।८३
विषय ........ क्र. ..........

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर,

मुंबई

★

BVBK-0401544

किंमत ७५ पैसे
[redacted]

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोट्या-छोट्या पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकाच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी भेट देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

म. गं. मं. ठाणे
१५१९/७
१५८७

# कार्तिक मास

चैत्र महिन्याप्रमाणेच कार्तिक महिन्याचा प्रारंभ सुद्धा साडेतीन मुहूर्तांतील एका मुहूर्ताने होतो नि तो मुहूर्त म्हणजे बळीप्रतिपदा ऊर्फ बळी पाडवा ! काही व्यापारी लोकांचे वर्ष कार्तिक महिन्यापासून सुरू होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच या नव्या वर्षाच्या वह्यांची पूजा केली जाते. दिवाळी हा आपला वर्षातील सर्वांत मोठा सण असतो व त्या दिवाळीतच या महिन्याला प्रारंभ होतो. त्यावरून या महिन्याचे महत्त्व लक्षात येईल. या महिन्यातील वातावरण सुद्धा प्रसन्न असते. पावसाळा संपून हिवाळ्याला सुरुवात होत असल्याने हवा फार उष्ण अथवा फार थंड नसते. तसेच चांदणेही स्वच्छ पिठासारखे व रम्यता आणणारे वाटते. या महिन्यातील शरदृतूचे चांदणे इतके आल्हाददायक असते की, ते आपल्या नजरेत भरल्याशिवाय राहात नाही. वाल्मिकी, कालिदास तसेच ज्ञानेश्वरांनीही "जैसे शारदियेचे चंद्रकळे" असे वर्णन उगीच केलेले नाही. याचा अनुभव तुम्हांला कोजागरीच्या रात्री चांदण्याकडे पाहून नक्की येईल.

## बळीप्रतिपदा

या महिन्यातील पहिला सण म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदा. या दिवाळीतील पाडव्याला बळीप्रतिपदा असे म्हणतात. मागे चैत्रात सांगितलेल्या साडेतीन मुहूर्तांतील हा एक पूर्ण मुहूर्त आहे. भाद्रपद महिन्यात वामन द्वादशीला आपण बळीची कथा वाचलेली आहेच. तीन पावले दान घेताना बळीच्या सांगण्याप्रमाणे तिसरे



पाऊल वामनाने बळीच्या डोक्यावर ठेवून त्यास पाताळात लोटले ही गोष्ट खरी ! परंतु दानप्रिय वृतीला जागून बळीने दिलेला शब्द पाळला. या त्याच्या चांगुलपणाबद्दल वामनाला संतोष झाला व त्याने बळीला पाताळाचा राजा करून "कार्तिक शुद्ध प्रतिपदेला लोक तुझे स्मरण करतील" असा वर दिला. त्याप्रमाणे बळीचेच नाव घेऊन ही प्रतिपदा साजरी करण्यात येते. या दिवशी पहाटे

माजघरात बळी व त्याची बायको विंध्यावली य दोघांचे चित्र काढून त्यांची पूजा करतात. कोणी कोणी बळीची पिठाची मूर्ती करून ती पूजतात. या दिवाळीतील महत्त्वाच्या दिवशी खेड्यातील लोक ओवाळताना " ईडा पीडा जावो बळीचे राज्य येवो " असे म्हणतात. याचा अर्थ माणसाला त्याच्या आयुष्यात बळीसारखे ऐश्वर्य प्राप्त व्हावे असा आहे. एवढे ऐश्वर्य बळीराजाला लाभले होते बरे का !

या सणासंबंधी मुंबईकर लोकांत वेगळीच रीत आहे. पहाटे दारात शेणाच्या बाहुल्या किंवा गोळे करून त्यावर दिवे ठेवतात नि कारिट नावाचे फळ फोडतात.

व्यापारी लोकांचे नवे वर्ष ह्या पाडव्यापासून सुरू होते आणि आपले विक्रम संवतही ह्याच दिवशी सुरू होते. कारण पूर्वी विक्रम राजाला अभिषेक ह्याच दिवशी झाला होता.


**भाऊबीज**

ह्याच्या दुसऱ्या दिवशी भाऊबिजेचा सण येतो. ह्या तिथीला यमद्वितीया म्हणतात. फार वर्षांपूर्वी ह्या दिवशी यम आपली बहीण यमी हिच्याकडे गेला होता. तिने त्याला ओवाळले होते आणि यमाने तिला ओवाळणी घातली होती.

म्हणून ह्या दिवशी बहीण भावाला ओवाळते. सख्खा भाऊ नसल्यास चुलत, मामे किंवा मावस भावाला ओवाळते. अन् सख्खा भाऊ बाहेर गावी गेला असल्यास चंद्राला भाऊ समजून आरती करण्याची जुन्या बायकांची रीत होती.

वर्षभर बहीणभावांनी एकमेकांचे तोंड पहावयाचे नाही, नि फक्त भाऊबिजेच्या दिवशी बहिणीच्या घरी भावाने उगवायचे

असा ह्याचा अर्थ नाही. वर्षभर एकमेकांशी प्रेमाने वागावयाचे आणि भाऊबिजेला त्याबद्दल परस्परांचे कौतुक करून बहिणीने भावाला ओवाळावयास हवे.



लहानपणी भावंडे कारणावाचूनही एकमेकांबरोबर भांडतात. त्यांची कट्टी होते. अबोला चालू होतो, पण भाऊबिजेच्या दिवशी अबोला आपोआप सुटतो. मग भाऊबीज दर महिन्याला आली असती तर बरे असे म्हटले पाहिजे !

वर्षातून एकदा बहिणीच्या घरी येणारा भाऊ महिन्यातून एकदा येईल. पण सण वर्षातून एकदाच येतो ना ? तेव्हा ह्यावर अशी युक्ती करावी. भावंडांचे एकमेकांशी बिनसले की आज भाऊबीज आहे अशी त्यांनी एकमेकांची समजूत घालावी. लुटुपुटीची भाऊबीज साजरी करावी नि समेट करावा.

ही झाली लहान बहीणभावांची गंमत. मोठ्या बहिणीने सुद्धा असाच थोडा वेगळा प्रकार करावा. स्वतःच्या संसारात किंवा उद्योगधंद्यात गुंतल्यामुळे बहिणीकडे उभ्या वर्षात एकदाच येतो भाऊराया. ठीक ! मजेने त्याला बहिणीने निरोप धाडावा की, उद्याच्या रविवारी आपली भाऊबीज आहे तरी तू अवश्य जेवायला किंवा चहाला ये.

स्त्री कितीही मोठी झाली, वयाने व श्रीमंतीने मोठी झाली तरी तिला भाऊबिजेला भावाने घातलेल्या ओवाळणीची भारी अपूर्वाई वाटते. कारण त्यामागे त्याच्या मायेची ऊब असते. गरीब भावाने घातलेल्या ओवाळणीचे कौतुक कमी आणि श्रीमंत भावाने घातलेल्या ओवाळणीचे कौतुक जास्त असा भेद खरी प्रेमळ बहीण करीत नसते.

म्हणूनच बहीणभावांच्या प्रेमाचे महत्त्व मोठे असते. लोकोपयोगी सार्वजनिक संस्था ह्याचसाठी भाऊबीज फंड काढतात. भाऊबिजेदिवशी अशा संस्थांना अवश्य थोडीफार मदत द्यावी.

आजकाल पुष्कळशा शाळा मिश्र असतात. म्हणजे त्या शाळेत मुलगे व मुली एकत्र शिक्षण घेतात; पण मराठी पाचवीत मुले जातात तोच ते मुलगे, आम्ही मुली, त्या मुली आम्ही मुलगे असे बहिष्कार सुरू होतात. हे अगदी गैर आहे. आपण सगळी भावंडे आहोत, आपल्या शाळामातेची लेकरे आहोत. असे मुलांमुलींनी मानावयाला हवे. म्हणजे मी मुलगी, तो मुलगा असा भेद मनाला टोचणार नाही. तो मुलगा खरा, पण माझा भाऊ आहे. नि ती मुलगी असली तरी माझी बहीण आहे. असा विचार करावयाला हवा. अन् त्या विचाराचा योग्य उच्चार करून त्याला साजेल असा आचार असावयाला हवा !

दिवाळीच्या सुट्टीत भाऊबिजेचा सण येतो. तेव्हा सुट्टीनंतर शाळा उघडल्यावर मुलांमुलींनी हे प्रेमळ नाते द्यावे, घ्यावे आणि शालेय जगात ते कायम ठेवावे.

उगीच एकमेकांशी अबोला धरल्यामुळे सर्वांचेच नुकसान होते. वर्गातली मुलगी शेजारी रहात असली तरी तिला वर्गातील अभ्यास विचारावयाचा नाही! पण का? ती बहीण ना तुझी? मग बहिणीशी बोलणे गैर का आहे?

अन् मुलगे-मुली इतकी अनुकरणप्रिय असतात की, कोणी तरी एका मुलामुलीने हे सलोख्याचे उदाहरण घालून दिले की सर्वजण डोळे झाकून ते गिरवतील!

मुलामुलीची जी जोडी असले उदाहरण घालून देईल तिला भाऊबिजेच्या सणाचे रहस्य खरे कळले आहे असे म्हणावयास हवे!

प्रत्येकाने आपल्या चुकीची दुरुस्ती तर करावीच. पण ती मुळीच न करण्यापेक्षा निदान उशिरा तरी करावी. ह्या भाऊबिजेला नाही तर पुढल्या भाऊबिजेला किंवा राखी पौर्णिमेला—राखी पौर्णिमा तर विशेषतः मानलेल्या भावंडांचाच सण आहे—केव्हाही करावी. पण चुकीची दुरुस्ती माणसाने करावीच. नाहीतर मनुष्य व जनावर ह्यांत भेद काय? जनावरांपेक्षा मनुष्याला बुद्धीचे वरदान अधिक मिळालेले असते ना? तेव्हा त्याने ह्या बुद्धीचा उपयोग करायलाच हवा!

## कार्तिकी एकादशी

आता ह्यानंतरचा महत्त्वाचा दिवस म्हणजे एकादशी. आषाढी एकादशीप्रमाणे ह्या कार्तिकी एकादशीलाही महा-एकादशी म्हणतात. आषाढी एकादशीला 'शयनी' व कार्तिकी एकादशीला

'प्रबोधिनी' म्हणतात. आषाढापासून कार्तिकापर्यंत पावसाळा सुरू असतो. त्यामुळे ह्या दिवसात सूर्याचे दर्शन फारसे होत नाही. म्हणून ह्या काळात भगवान विष्णू झोपी जातात अशी त्यांच्या भक्तांची कल्पना असते. कारण भगवान विष्णू म्हणजेच सूर्यदेवता.

चातुर्मासाचे चार महिने जुनी माणसे कसले तरी व्रत करितात. नि कार्तिकी एकादशीला चातुर्मास संपतो. त्यामुळे त्या दिवशी किंवा त्यानंतर लगेच ह्या व्रताचे उद्यापन करितात. म्हणजे व्रत पुरे करितात. नि त्या प्रीत्यर्थ ब्राह्मणाला दान, दक्षिणा देतात.

अशा तऱ्हेची दाने व दक्षिणा ब्राह्मणालाच दिली पाहिजे, ही जुनी कल्पना आता थोडी बदलावयास हवी. ब्राह्मणाऐवजी एखाद्या गरीब व गरजू माणसाला हे पैसे दिले तर सार्थक होईल दानाचे. दान देण्याची जुनी कल्पना आणि सत्पात्र माणूस शोधण्याची नवी योजना ह्यांची अशी सांगड घालावी. ह्याला डोळस श्रद्धा म्हणतात. अंधश्रद्धा वाईट; पण डोळस श्रद्धा खरोखर चांगली ! त्यामुळे माणसाच्या चांगुलपणावर आपला विश्वास बसतो आणि आपला आत्मविश्वास वाढतो !

## तुलसी-विवाह

एकादशीच्या दुसऱ्या दिवशी--कार्तिक द्वादशीला--तुळशीचे लग्न करण्यात येते. ह्या संबंधीची कथा अशी आहे. फार पूर्वी जालंधर नावाचा एक महाप्रतापी योद्धा होऊन गेला. त्याने देवांना जिंकून आपल्या भाईबंद दैत्यांना सुखी केले होते. त्याची पत्नी वृंदा मोठी पतिव्रता होती. तिच्या पुण्याईने जालंधर त्रिभुवनात अजिक्य होऊन बसला. त्याचा पाडाव कसा करावा, ते देवांना काही कळेना. शेवटी थोडे कपट —खोटेपणा—करण्याचा त्यांनी बेत केला.

जालंधर लढताना मरण पावला, अशी बतावणी करण्याचे देवांनी ठरविले आणि जालंधराचे मस्तक व धड असे शरीराचे दोन भाग दोन माकडांकडून वृंदेच्या पुढ्यात आणून टाकले. बिचारी वृंदा दुःखाने व्याकुळ होऊन शोक करू लागली. इतक्यात एक कपटी साधू तिथे आला आणि मेलेल्या जालंधराला उठविण्यासाठी तो संजीवनी मंत्र जपू लागला. तेव्हां मस्तक व धड सांधले गेले. आणि जालंधरासारखा दिसणारा विष्णू उभा राहिला. आपला नवरा जिवंत झाला असे वाटून भोळ्या वृंदेने त्या खोट्या जालंधराला आनंदातिशयाने मिठी मारली.—

झालं ! अज्ञानाने का होईना पण परक्या पुरुषाचा स्पर्श झाला ! अर्थातच पतिव्रता म्हणून तिची जी पुण्याई होती ती नाहीशी झाली आणि जालंदर युद्धात खरोखरीच मरण पावला.

वृंदेला खरी हकीकत कळल्यावर ती अतिशय चिडली. आणि त्या साध्वीने सात्विक संतापाने विष्णूला शाप दिला. "तुला पत्नीचा वियोग घडून माकडांची मदत घेण्याची पाळी तुझ्यावर येवो." हा तो शाप.

आणि खरोखर तसेच विष्णूने रामावतार घेतल्यावेळी घडले. श्रीरामाला त्याच्या पत्नीचा—सीतेचा—वियोग घडला, रावणाने तिला पळवून नेले आणि मग माकडांचीच मदत घेऊन त्याने सीतेला सोडविले.

निष्पाप, निरपराध माणसांना विनाकारण छळणे फार वाईट ! त्यांचे तळतळाट मग असे भोवतात. ती माणसे गरीब व दुबळी असल्यामुळे आपल्याला त्रास देणाऱ्यांना शिक्षा करू शकत नाहीत; पण दुःख अनावर झाले की, साहजिकच ती शाप देतात. नि मोठ्या सत्ताधारी लोकांनासुद्धा असल्या शापाचे परिणाम

भोगावे लागतात. कारण त्या बिचाऱ्या निष्पाप माणसांच्या आत्म्याचे बळ तसेच मोठे असते! तेव्हा हे नेहमी लक्षात ठेवावे. आपल्याला खुसपट काढण्याची खुमखुमी येते केव्हा केव्हा. अशा वेळी आपल्या बरोबरीच्या व्यक्तीचे खुसपट काढावे. तुल्यबळ व्यक्तीशी दोन हात करावे. पण दुर्बलांना उगाच नाडू नये. त्याबद्दल पुढे मागे आपल्याला शिक्षा भोगावी लागते !

नंतर वृन्देने चिता रचून तीत उडी टाकली. आपण केलेल्या कपटामुळे त्या सतीने जीव दिला, हे विष्णूच्या मनाला फार लागले. तो वेड्यासारखा त्या चितेजवळ बसून राहिला. पुढे त्याचे हे वेड जावे म्हणून स्मशानात त्या जागी देवांनी तुळस, आवळा व मालती ही तीन झाडे लावली. त्यातील तुळस ही वृन्देप्रमाणे सर्व-गुणसंपन्न आहे, असे वाटून विष्णूला तुळस फार आवडू लागली.

वृन्देने चुकीने का होईना, पण विष्णूला क्षणभर आपला पती मानले होते. म्हणून विष्णूने कृष्णाचा अवतार घेतल्यावेळी वृन्देने रुक्मिणीचा अवतार घेतला आणि कार्तिक शुद्ध द्वादशीला त्यांचा विवाह झाला. म्हणून ह्या दिवशी हा रुक्मिणी-कृष्ण विवाहच साजरा केला जातो.

त्या दिवशी तुळशी-वृन्दावन सारवितात. त्यात ऊस पुरून आवळे व ओली चिंच टाकतात. वृन्दावनाभोवती ऊस रचून छान-दार मांडव तयार करण्यात येतो. नि मग मंगलाष्टके म्हणून तुळसीचा कृष्णाच्या मूर्तीबरोबर विवाह लावितात व जमलेल्या मंडळींना लाह्या, कुरमुरे, उसाच्या गंडेऱ्या वगैरे देतात.

जुने लोक चातुर्मासात लग्ने करीत नाहीत. कार्तिकी एकादशीला चातुर्मास संपतो. दुसऱ्या दिवशी तुळशीचे लग्न होते. मग पुढल्या चातुर्मासापर्यंत मुहूर्त पाहून माणसांची लग्ने होतात.

**वैकुंठ चतुर्दशी**

आता ह्यानंतर शुक्ल चतुर्दशीला वैकुंठचतुर्दशी हे नाव आहे, त्याबद्दल अशी कथा आहे. एकदा श्री विष्णू वैकुंठाहून काशी-क्षेत्री आले. तिथल्या मणिकर्णिका नदीत स्नान करून काशी-विश्वेश्वराला सहस्र म्हणजे हजार कमले वहाण्याचा त्यांनी निश्चय केला होता. त्यांची परीक्षा पहावी असे श्रीशंकराला वाटले. आणि पूजा सुरू असता त्याने एक कमल बाजूला सारले. अर्थात्च हजाराचा आकडा पुरा होण्यास एक कमल कमी पडले. तेव्हा शेवटच्या कमलाची भरती करण्यासाठी श्रीविष्णूने आपला डोळा-



नेत्रकमल—अर्पण केले.विष्णूचीं ही भक्ती पाहून शंकर प्रसन्न झाला व त्याने विष्णूला चक्रायुध दिले.

ह्या हरिहर भेटीप्रीत्यर्थ—विष्णू-शंकर भेटी-प्रीत्यर्थ—ह्या चतुर्दशीला वैकुंठचतुर्दशी म्हणतात.

आपल्यांत वैष्णव व शैव असे भेद आहेत. वैष्णव विष्णूलाच भजतात. कपाळाला गोपीचंदन लाऊन गळ्यात तुळसीमाला

घालतात. शैव शिवाला भजतात. कपाळाला भस्म लावून गळ्यात रुद्राक्षमाळा घालतात आणि दोघेही एकमेकांच्या देवाला तुच्छ मानतात. हा विनाकारण गोंधळ झाला आहे. वास्तविक परमेश्वर एकच आहे. विष्णू, शंकर वगैरे त्याचीच रूपे आहेत. हे लक्षात ठेवून हे मतभेद नाहीसे केले पाहिजेत. म्हणजेच आपल्या लोकांत खरी नि पूर्ण एकी होईल!

## त्रिपुरी पौर्णिमा

नंतर येते कार्तिकी पौर्णिमा ऊर्फ त्रिपुरी पौर्णिमा. पुराणात त्रिपुरी पौर्णिमेची कथा सांगितली आहे ती अशी : पूर्वी त्रिपुर ह्या नावाचा एक राक्षस होऊन गेला. तो मोठा महत्त्वाकांक्षी होता. देवांच्या बरोबरीचाच नव्हे, तर त्यांच्याहूनही मोठा होण्याची त्याची इच्छा होती. त्याने ब्रह्मदेवाची भक्ती आरंभिली. त्याच्या-कडून अमरपणा मिळवायचा होता त्याला. देवांनी हे ओळखले आणि त्रिपुराच्या तपःसाधनेत विघ्न आणण्याचा प्रयत्न केला. परंतु ते जमले नाही. ब्रह्मदेव त्रिपुरावर संतुष्ट झाला नि त्याने त्याला अभयदान दिले.

अभयदान म्हणजे कोणाकडूनही त्याला भय वाटण्याचे कारण नाही असा वर देणे. अर्थातच ह्यात अमरपदही आलेच. कारण मृत्यूचेही भय नाही. त्यामुळे त्रिपुरासुर बेहद्द खूष झाला. तो देवांना तुच्छ लेखू लागला. त्यांच्या नाकावर टिच्चून त्यांच्याच ब्रह्मदेवाकडून एवढा मोठा वर मिळविला ना त्याने! म्हणून तो उद्दामपणे देवांना त्रास देऊ लागला. त्याने आपल्या तीन नगरांच्या भोवती बळकट तट बांधला. त्या तटापुढे देवांचे काही चालेना. त्रिपुरासुराचा नाश करण्याचा भगवान विष्णूनेही प्रयत्न


केला, पण व्यर्थ! तेव्हा देवांनी त्रिपुराचा पाडाव करण्याबद्दल शंकराला विनंती केली. शंकराने तीन दिवस युद्ध केले आणि



कार्तिक पौर्णिमेला त्याचा वध केला.

ह्यासंबंधी दुसरीही एक कथा आहे. प्राचीन काळी मयासुर नावाचा एक राक्षस होता. त्याने ब्रह्मदेवाला प्रसन्न करून तीन पुरे—नगरे—वसविली. ह्या तीन पुरांतील—त्रिपुरातील—राक्षसांनी जोपर्यंत देवांना त्रास दिला नाही तोपर्यंत त्यांची भरभराट होती. पण पुढे तारकासुर ह्या नावाचा राक्षस तिथला मुख्य झाला. त्याला तीन मुलगे होते. त्यांची नावे तारांक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली अशी होती आणि त्यांच्याकडे त्रिपुराची सत्ता येताच त्यांनी देवांना सतावण्यास सुरुवात केली. तेव्हा शंकराने त्यांच्याशीं युद्ध करून त्यांना जाळून टाकले.

त्रिपुरासुराच्या जाचातून देवांची व सृष्टीची सुटका झाली. अन् म्हणून त्यांनी मोठा आनंदोत्सव-केला. दिव्यांची रोषणाई केली. तेव्हा पासून त्रिपुरी पौर्णिमेला दिव्यांचा चकचकाट करण्याचा प्रघात पडला.



स्त्रिया ह्या दिवशी कोहळा व दीप-दान देतात. सायंकाळच्या वेळी नदीच्या पात्रात पेटते दिवे सोडतात. प्रवाहात वहात जाणारे ते दीप फार सुंदर दिसतात. जणू आकाशातील तारकाच आंघोळ करण्यासाठी नदीच्या पात्रात उतरल्या आहेत, असे वाटते!

दिव्यांच्या ह्या रोषणाईमुळे त्रिपुरी पौर्णिमेला कोणी कोणी मोठी दिवाळी म्हणतात.

### जगमित्र नागा—पुण्यतिथी

ह्याशिवाय आणखी एक महत्त्वाचा दिवस येतो ह्याच पंधरवड्यात. तो म्हणजे जगमित्र नागा ह्या संताची पुण्यतिथी.

कार्तिक शुद्ध एकादशीला येते ही पुण्यतिथी. जगमित्र नागा हा परळी वैजनाथ गावचा रहाणारा. गावात भिक्षा मागून तो रहात असे. रात्रीच्या वेळी तो कीर्तन करी नि ते ऐकण्यास लोकांची फार गर्दी होई. गावातील कित्येक लोक जगमित्राची स्तुती करीत. तर काही लोक निंदा करीत, पण जगमित्र त्यांच्या-कडे लक्ष देत नसे.

एका रात्री जगमित्र घरात निजला होता. काही दुष्ट लोकांनी त्याच्या घराला आग लावली. एकदम मोठा उजेड झाल्यामुळे जगमित्र जागा झाला नि पहातो तर आपले खोपट

जळते आहे! त्याची मुले, माणसे आत निजली होती. ती आता सुरक्षित कशी राहतात असे त्याला भय वाटले. त्याने पंढरीनाथाची आठवण केली. लगेच भगवंत प्रकट झाले नि त्यांनी अग्नीपासून त्या कुटुंबाचे रक्षण केले.

पुढे जगमित्राला थोडी जमीन इनाम द्यावी असे लोकांनी ठरविले आणि जगमित्राला तसे सांगितले, पण तो पडला निरिच्छ संत! त्याला पैशाचा, जमिनीचा लोभ कसला असणार? त्याने स्पष्ट सांगितले, ' मला जमीन काय करावयाची आहे? मी गावात भिक्षा मागतो. त्याच्यावर माझ्या कुटुंबाचे पोट भरते. मग आणखी जमिनीच्या लोभात मी कशाला पडू ?" जगमित्राचे हे उत्तर ऐकून साहजिक लोकांचा त्याच्याबद्दल आणखीच पूज्यभाव वाढला.

लोकांनी जगमित्राचे घर जाळण्याचा प्रयत्न केला, ह्यावर त्याने अभंग रचला आहे. त्यापैकी काही ओव्या अशा—

**अग्नि जाळी तरी न जळे प्रल्हादू । हृदयी गोविंदू म्हणोनिया ॥१॥**
**अग्नि जाळी तरी न जळती पांडव । हृदयी वासुदेव म्हणोनिया ॥२॥**
**अग्नि जाळी तरी न जळे बिभीषणाचे घर।हृदयी सीतावर म्हणोनिया॥३॥**
**जगमित्र नागा न जळे जरी अग्नि जाळी।हृदयी वनमाळी म्हणोनिया॥४॥**

जगमित्र खरा मोठा होता. म्हणून आपले घर जळल्यावेळी झालेल्या चमत्काराचे श्रेय त्याने ज्याचे त्याला दिले. देवाने हा चमत्कार घडविला. आपल्या हृदयात देव होता म्हणून हे अजब घडले असेच तो मानीत होता, जे स्वतः मोठे असतात तेच दुसऱ्याला मोठेपणा देऊ जाणतात! आणि स्वतः मोठे नसतात ते दुसऱ्याचा मोठेपणा हिरावून घेऊ पहातात नि तो स्वतःला जडविण्यासाठी धडपडतात. पण मोठेपणा असा मागून मिळत नसतो बरं!

## ज्ञानेश्वर पुण्यतिथी

आता कार्तिकाच्या पुढल्या पंधरवडयात--वद्य पक्षात--फक्त एकच महत्त्वाचा दिवस आहे, पण तो एकच असला तरी अनेक मोठया दिवसांपेक्षा तो मोठा आहे. मोठेपण हे संख्येपेक्षा गुणांवर अवलंबून असते! आकाशात एवढे असंख्य तारे दिसतात, पण रात्रीचा काळोख ते कमी करू शकतात का? उंहुं ! पण तेच एकटा चंद्र हा काळोख कमी करू शकतो! खरे ना ? म्हणजे संख्येपेक्षा गुणांचे महत्त्व अधिक असते!

तेव्हा असा हा महत्त्वाचा एकच दिवस म्हणजे कार्तिक वद्य त्रयोदशी ! ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथी!


ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वराला भगवान विष्णूचा अकरावा अवतार मानण्यात येते. त्याचा मनुष्यदेह होता, पण गुण दैवी होते. अशा ह्या लोकोत्तर सत्पुरुषाची ही चरित्र कहाणी ऐका.

पैठणच्या पूर्वेला चार कोसांवर गोदावरीच्या उत्तरतीरी आपेगाव नावाचे एक गाव आहे. तिथे विठ्ठलपंत कुळकर्णी रहात असत. त्यांच्या बायकोचे नाव रुक्मिणी. विठ्ठलपंतांचे चित्त संसारात नसे. ते नेहमी ईश्वरचिंतनात गुंग असत. रुक्मिणीबाईच्या वडिलांनी त्या दोघाना आपल्या गावी--आळंदीला--आणले.

काही वर्षे आळंदीत बरे चालले होते, पण नंतर विठ्ठलपंत बायकोच्या मागे टुमणे लाऊ लागले की " मला काशीला जाऊन रहावयाचे आहे. मला संन्यास घेण्याची परवानगी दे."

आपल्या हिंदू धर्माप्रमाणे पुरुषांना चार आश्रम सांगितले आहेत. आश्रम ह्याचा इथे आयुष्यातील टप्पे असा अर्थ घ्यावयाचा. पहिला ब्रह्मचर्याश्रम. ह्या आश्रमात विद्याभ्यास करावयाचा असतो. पुढला गृहस्थाश्रम. ह्यात लग्न करून संसारी व्हावयाचे. ह्यानंतर वानप्रस्थाश्रम. ह्यामध्ये संसाराचा भार मुलांवर टाकून रानात जाऊन राहावयाचे आणि मग शेवटला संन्यासाश्रम. ह्या आश्रमात संसाराचा संबंध पार तोडावयाचा असतो.

पण विठ्ठलपंत टप्प्याटप्प्याने जाऊ इच्छित नव्हते. गृहस्थाश्रम सुद्धा त्यांनी नीट पार पाडला नव्हता. कारण त्यांना मुले झाली नव्हती, तरीही पुढला वानप्रस्थाश्रम गाळून ते शेवटला संन्यासाश्रम गाठू इच्छित होते. अर्थातच रुक्मिणीबाई परवानगी कशी देईल? पण एकदा तिचे लक्ष नसताना विठ्ठलपंतांनी विचारले, "मी गंगेवर स्नानाला जाऊ" रुक्मिणीने पटकन 'जा' म्हटले. तीच पडत्या फळाची आज्ञा मानली विठ्ठलपंतांनी आणि ते तडक काशीला गेले.

तिथे ते रामानंदस्वामींचे शिष्य झाले. "मी एकटा आहे. मला बायकोमुलांचा पाश नाही." असे खोटेच पंतांनी सांगितले आणि स्वामींना ते खरे वाटून त्यांनी त्यांना संन्यास दिला नि त्यांचे 'चैतन्याश्रम' असे नाव ठेवले.

पंतांच्या संन्यासाची बातमी कानोकानी रुक्मिणीबाईला समजली. तिला फार वाईट वाटले, पण उपाय काय? कडक उपास, तापास करण्यात तिने बारा वर्षे घालविली. पुढे योगायोगाने रामानंद स्वामी रामेश्वराला जाण्यासाठी दक्षिणेत आले. त्यांचा मुक्काम आळंदीत पडला.

स्वामी मारुतीच्या देऊळात उतरले. रुक्मिणीबाई नेहमीप्रमाणे मारुतीच्या दर्शनाला आली नि तिथे स्वामींना पाहून तिने

नमस्कार केला. स्वामींनी पटकन् "पुत्रवती भव" असा आशीर्वाद दिला. तो ऐकताच बाई खिन्नपणे हसली. साहजिक स्वामींनी हसण्याचे कारण विचारले.

बाईची हकीकत कळताच काशीत ज्याला आपण संन्यासाश्रम दिला तोच हिचा नवरा हे त्यांना उमगले. अरेरे! एका निष्पाप, सुशील स्त्रीच्या संसारात आपण अडथळा आणला ना? -हं ऽ! –मग रामेश्वराला जाण्याचा बेत त्यांनी रद्द केला. ते काशीला परतले. रुक्मिणीबाई व तिचे वडीलही काशीला गेले आणि स्वामींच्या आज्ञेमुळे पंतांनी पुन: गृहस्थाश्रम स्वीकारला आणि ते आळंदीला येऊन राहिले.

आळंदीमधील कर्मठ ब्राह्मणांना हे आवडेना. त्यांनी पंतांचा व बाईचा फार छळ चालविला. त्यातच दोन-दोन वर्षांच्या अंतराने बाईला निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई ही चार मुले झाली नि त्यांना संन्याशाची मुले म्हणून हिणविण्यास तिथल्या लोकांनी सुरुवात केली.

पुढे मुलांची मुंज करण्याची वये झाली, पण ब्राह्मण संन्याशाच्या मुलांना का मुंजीची परवानगी देणार? पंतांनी म्हटले, "तुम्ही सांगाल ते प्रायश्चित्त घेतो." पण छेः! ब्राह्मणांच्या मते पंतांचे पाप फारच मोठे होते. त्या पापाला एकच प्रायश्चित्त नि ते म्हणजे देहान्त प्रायश्चित्त. म्हणजे पंतांनी व बाईने जीव द्यायला हवा!


अन् मुलांसाठी त्या उभयतांनी तेही केले. ती दोघे प्रयागला गेली नि गंगायमुना संगमात त्यांनी उडी टाकली.

बिचारी लहानगी मुले! ना माणसांचा धीर—ना पैशाचा आधार! चारी भावंडे आपेगावला रहाण्यास गेली, पण तिथे

त्यांच्या भाऊबंदांनी त्यांना घरात घेतले नाही आणि त्यांच्या उत्पन्नाचा वाटाही त्यांना दिला नाही.

तेव्हा निवृत्ती व ज्ञानदेव ह्यांनी भिक्षा मागावी व सोपानाने मुक्ताबाईला सांभाळायचे असा क्रम सुरू झाला. नंतर काही दिवसांनी ती चौघे आजोळी, आळंदीला गेली. तिथून ज्ञानदेवाच्या आग्रहावरून निवृत्ती भावंडासह पैठणला गेला. तिथल्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र हवे होते त्यांना. शुद्धिपत्र म्हणजे संन्याशाची मुले असली तरी त्यांच्या पदरी काही दोष नाही, ती शुद्ध आहेत, असे सांगणारा कागद.

ज्ञानेश्वराला ठाऊक होते की, चमत्काराशिवाय नमस्कार



नाही. म्हणून त्याने रेड्याच्या तोंडून वेद वदविला. हा चमत्कार पाहून तिथले ब्राह्मण थक्क झाले. त्यांनी ज्ञानेश्वराचा जयजयकार केला आणि शुद्धिपत्र दिले.

नंतर ही भावंडे नेवासे गावी रहावयास गेली व तिथे ज्ञानेश्वरी हा अप्रतिम ग्रंथ ज्ञानेश्वरांनी रचला. हा ओवीमध्ये

लिहिला आहे नि त्यामुळेच पुढील आर्या प्रसिद्ध झाली आहे.

> सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
> ओवी ज्ञा ेशाची किंवा आर्या मयूरपंताची ।।

ओवी ह्या साध्या कवितेच्या प्रकाराला ज्ञानेश्वरांनी महत्त्व आणले, मोठेपणा आणला.

पुढे वयाच्या एकविसाव्या वर्षी ज्ञानेश्वरांनी कार्तिक वद्य त्रयोदशीला आळंदी मुक्कामी जिवंत समाधी घेतली.

अवघ्या एकवीस वर्षांच्या वयात त्यांनी केवढी कीर्ती कमावली. नुसती आयुष्याची लांबी मिळाली म्हणजे होत नाही. त्याला कर्तृत्वाची रुंदी असावी लागते. तरच त्या लांबीची शोभा! नाही तर त्यापेक्षा असे कर्तृत्ववान अल्पायुष्यच फार बरे! आयुष्याचे सार्थक केले ज्ञानेश्वरांनी.

तेव्हा अशा पुण्यवान थोर पुरुषाची पुण्यतिथी ह्या पंधरवड्यात येते. नि म्हणून ह्या एका महत्त्वाच्या तिथीने कार्तिकाचा हा दुसरा पंधरवडा पूज्य झाला आहे!

पवित्र वस्तू स्वतः पवित्र असतात. नि आपल्या सहवासाने दुसऱ्यांना असे पवित्र करितात.

### माधवराव-रमाबाई पेशवे पुण्यतिथी

ह्यानंतर कार्तिक वद्य अष्टमीला माधवराव पेशवे व त्यांची पत्नी रमाबाई ह्यांची जोड पुण्यतिथी येते.

माधवराव हा नानासाहेब पेशवे व गोपिकाबाई ह्यांचा दुसरा मुलगा. ह्याचा थोरला भाऊ विश्वासराव पानिपतच्या लढाईत मारला गेला आणि पाठचा भाऊ नारायणराव हा आनंदी-

त्यांच्या भाऊबंदानी त्यांना घरात घेतले नाही आणि त्यांच्या उत्पन्नाचा वाटाही त्यांना दिला नाही.

तेव्हा निवृत्ती व ज्ञानदेव ह्यांनी भिक्षा मागावी व सोपानाने मुक्ताबाईला सांभाळायचे असा क्रम सुरू झाला. नंतर काही दिवसांनी ती चौघे आजोळी, आळंदीला गेली. तिथून ज्ञानदेवाच्या आग्रहावरून निवृत्ती भावंडासह पैठणला गेला. तिथल्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र हवे होते त्यांना. शुद्धिपत्र म्हणजे संन्याशाची मुले असली तरी त्यांच्या पदरी काही दोष नाही, ती शुद्ध आहेत, असे सांगणारा कागद.

ज्ञानेश्वराला ठाऊक होते की, चमत्काराशिवाय नमस्कार



नाही. म्हणून त्याने रेड्याच्या तोंडून वेद वदविला. हा चमत्कार पाहून तिथले ब्राह्मण थक्क झाले. त्यांनी ज्ञानेश्वराचा जयजयकार केला आणि शुद्धिपत्र दिले.

नंतर ही भावंडे नेवासे गावी रहावयास गेली व तिथे ज्ञानेश्वरी हा अप्रतिम ग्रंथ ज्ञानेश्वरांनी रचला. हा ओवीमध्ये

लिहिला आहे नि त्यामुळेच पुढील आर्या प्रसिद्ध झाली आहे.

> सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
> ओवी ज्ञा ेशाची किंवा आर्या मयूरपंताची ।।

ओवी ह्या साध्या कवितेच्या प्रकाराला ज्ञानेश्वरांनी महत्त्व आणले, मोठेपणा आणला.

पुढे वयाच्या एकविसाव्या वर्षी ज्ञानेश्वरांनी कार्तिक वद्य त्रयोदशीला आळंदी मुक्कामी जिवंत समाधी घेतली.

अवघ्या एकवीस वर्षांच्या वयात त्यांनी केवढी कीर्ती कमावली. नुसती आयुष्याची लांबी मिळाली म्हणजे होत नाही. त्याला कर्तृत्वाची रुंदी असावी लागते. तरच त्या लांबीची शोभा! नाही तर त्यापेक्षा असे कर्तृत्ववान अल्पायुष्यच फार बरे! आयुष्याचे सार्थक केले ज्ञानेश्वरांनी.

तेव्हा अशा पुण्यवान थोर पुरुषाची पुण्यतिथी ह्या पंधरवड्यात येते. नि म्हणून ह्या एका महत्त्वाच्या तिथीने कार्तिकाचा हा दुसरा पंधरवडा पूज्य झाला आहे!

पवित्र वस्तू स्वतः पवित्र असतात. नि आपल्या सहवासाने दुसऱ्यांना असे पवित्र करितात.

## माधवराव-रमाबाई पेशवे पुण्यतिथी

ह्यानंतर कार्तिक वद्य अष्टमीला माधवराव पेशवे व त्यांची पत्नी रमाबाई ह्यांची जोड पुण्यतिथी येते.

माधवराव हा नानासाहेब पेशवे व गोपिकाबाई ह्यांचा दुसरा मुलगा. ह्याचा थोरला भाऊ विश्वासराव पानिपतच्या लढाईत मारला गेला आणि पाठचा भाऊ नारायणराव हा आनंदी-

बाईमुळे गारद्यांच्या हातून मारला गेला. एकापेक्षा एक चांगले असे तिन्ही मुलगे वारले. त्यामुळे केवढा पुत्रशोक झाला असेल गोपिकाबाईला. ह्या प्रसंगावर 'गोपिकाबाईचा पुत्रशोक' ह्या नावाची करुण कविता प्रसिद्ध आहे.

माधवरावाला सोळाव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे मिळाली. त्याने फार पराक्रम केला. अनेक लढायांवर तो स्वतः गेला. राघोबादादांनी त्याला वेळोवेळी सतावले, पण हा त्याला पुरा पडत होता.

पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. ही गोष्ट माधवरावाला जाचत होती. ह्या पराभवाचा कलंक धुऊन काढण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असे तो समजत होता नि म्हणून ह्याने दोघा सेनापतींना फौज देऊन दिल्लीच्या स्वारीवर धाडले.

त्या सेनापतींनी पराक्रम करून दिल्ली काबीज केली. नि तिथल्या किल्ल्यावर मराठ्यांचे निशाण चढविले. त्याचप्रमाणे त्या वेळी दुसरा शहा अलम् बादशहा इंग्रजांच्या आश्रयाला होता. त्याला दिल्लीच्या सिंहासनावर बसविले. त्यामुळे बादशहाच्या सत्तेची प्रतीक असलेली शिक्काकटयार मराठ्यांच्या ताब्यात आली.

दहा वर्षांच्या आत मराठ्यांचे वर्चस्व दिल्लीत पुनः स्थापन झाले. आपल्या सेनापतींनी दिल्लीत गाजविलेल्या पराक्रमाची वर्णने ऐकून माधवराव फार खूष झाला. त्याला एवढा आनंद झाला की, त्या दोघांच्या अंगावर सोन्यारुप्याची फुले उधळीत त्यांना पुण्यात आणावे अशी त्याने आज्ञा केली होती.

निजामाने पुणे जाळले. त्यानंतर माधवरावानेच चांगला मुहूर्त पाहून पुण्याची पुनः रचना केली आणि पेठा वगैरे वसविल्या.

अशा ह्या पराक्रमी व कर्तबगार पेशव्याला क्षयरोग झाला



आणि अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी हा थेऊर मुक्कामी वारला.

त्याची पत्नी रमाबाई ही त्याच्याबरोबर सती गेली. म्हणूनच कार्तिक वद्य अष्टमी ही ह्या पेशवे जोडप्याची जोड पुण्यतिथी आहे. थेऊरला त्या उभयतांची समाधी आहे.

**नेहरू जयंती**

भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी झाला. नोव्हेंबर महिना सामान्यपणे कार्तिक महिन्यात येतो. म्हणून या महिन्यात आपण नेहरू जयंती साजरी करू या.


जयंती निमित्ताने पंडित नेहरूंच्या मोठेपणाची आपण ओळख करून घेतली पाहिजे.

श्रीमंत, खानदान कुटुंबात जन्म झाला असूनही जवाहरलालजींनी भारतमातेच्या उद्धारासाठी सर्व सुखैश्वर्याचा त्याग केला, आणि सर्वसाधारण माणसाप्रमाणे त्यांनी तुरुंगवास अनेकदा सोसला.

१९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये पंडित नेहरूंनी "संपूर्ण स्वातंत्र्या" चे ध्येय प्रथम जाहीर केले. यापूर्वी काँग्रेसचे ध्येय फक्त "ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतीचे स्वराज्य" एवढेच होते. याच अधिवेशनात दरवर्षी २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन

म्हणून पाळावा असे ठरले. त्याप्रमाणे प्रतिवर्षी हा दिवस साजरा करीत असत. स्वातंत्र्यानंतर भारत प्रजासत्ताक झाल्याचा प्रारंभ दिवस म्हणून हा दिवस आता साजरा केला जातो.

भारतीय काँग्रेसच्या धोरणाला आंतरराष्ट्रीय घडामोडीची पार्श्वभूमी पंडितजींनी आणली. त्या वेळी पंडितजींमुळे भारताप्रमाणे इतरही पददलित राष्ट्रांच्या स्वातंत्र्याला पाठिंबा देणारे ठराव काँग्रेसमध्ये पास होऊ लागले व पर्यायाने त्या राष्ट्रांची सहानुभूती पंडितजींनी भारताला मिळविली व सर्व परतंत्र राष्ट्रांना जागृत करण्यास त्यांची मदत झाली.



पंडित जवाहरलाल नेहरू

स्वातंत्र्यापूर्वी भारतातील समाजवादी चळवळीचे पुढारी म्हणून पंडितजी ओळखले जाऊ लागले व काँग्रेसमध्ये नवविचारांचे लोण त्यांनी आणल्यामुळे असंख्य तरुणांचे ते आवडते पुढारी बनले.

१९२१ ची असहकारितेची चळवळ, १९६२ ची सविनय कायदेभंगाची चळवळ व १९४२ चे 'चलेजाव' चे देशव्यापी आंदोलन यांत व इतर अनेक वेळी त्यांना तुरुंगवास पत्करावा लागला. चलेजावच्या ठरावानंतर ब्रिटिश सरकारने त्यांना अहमदनगर जेलमध्ये ठेविले होते.

परराष्ट्रीय धोरण हा पंडितजींचा आवडता विषय. त्याचा स्वातंत्र्यापूर्वीही त्यांचा गाढ व्यासंग होता. काँग्रेसच्या स्वातंत्र्या-

पूर्वीच्या परराष्ट्रीय धोरणाच्या ठरावातहि पंडित नेहरूच मार्गदर्शन करीत. स्वातंत्र्यानंतर रशिया व अमेरिका यांच्या विश्वव्यापी झगड्यात त्यांनी भारताचे तटस्थतेचे धोरण ठेवले आहे. यातूनच व पुढे चीनला दिलेल्या भेटीतून तसेच बांडुंग परिषदेतून पंचशीलेचा ध्वनी उमटला. पंचशील हे नेहरूंनी जगाला–अखिल विश्वाला दिलेले फार मोठे देणे आहे.

पंचशीलाप्रमाणेच जगात शांतता नांदावी म्हणून त्यांनी राष्ट्राराष्ट्रांच्या झगड्यात भारतातर्फे मध्यस्थी करवून शांतता निर्माण करण्यास साहाय्य केले आहे. कोरिया व इंडोचायनातील युद्ध, इजिप्तवरील आक्रमण इ. बाबतीत त्यांनी मध्यस्थी करून भारताची आंतरराष्ट्रीय कीर्ती वाढविली.

स्वतंत्र्यानंतर प्रत्येक देशाप्रमाणे भारताचीही आर्थिक पुनर्रचना करण्यासाठी पंचवार्षिक योजना त्यांनी सुरू केल्या. आर्थिक सुबत्तेशिवाय राजकीय स्वातंत्र्य टिकत नसल्याने व त्यामुळे अंतर्गत शांतताही नांदत नसल्याने देशाचा आर्थिक विकास करणे अपरिहार्य असते.

भारताचा सर्व बाजूंनी विकास करण्याच्या योजना त्यांनी आखल्या. त्या थोड्याफार अस्तित्वातही आल्या. पण—पण २७ मे १९६४ हा दुर्दिन उगवला. त्या दिवशी ऐन दोन प्रहरी दोन वाजता अचानक सूर्यास्त झाला. थोड्या तासांच्या आजारानंतर पंडितजींची प्राणज्योत मालविली. भारतात निराशेचा काळाकुट्ट काळोख पसरला. पंडितजी गेले. मुलांचे लाडके नेहरूचाचा गेले. “आराम हराम है” हे आपले आवडते ब्रीदवाक्य त्यानी शेवटपर्यंत आचारणात आणले. जरासुद्धा आराम न घेता ते अखेरपर्यंत काम करीत होते. आणि एकाएकी त्यांचा देह थकला, कायमची विश्रांती घेण्यासाठी ते आपल्यातून दूर निघून गेले.

पण आपला वारसा मागे ठेवून ते गेले आहेत हे आपण विसरता कामा नये. त्यांच्या पाउलावर पाऊल टाकून प्रगतीचा मार्ग चोखाळणे हे आपले कर्तव्य आहे. नेहरूंनी आधुनिक भारताचा पाया घातला. आता त्यांच्या कल्पनेला अनुसरून यापुढील इमारतीची रचना आपण भारतीय नागरिकांनी करायला हवी.

न्याय, आणि शुद्ध कृती, सहनशीलता आणि सामोपचारी वृत्ती हे नेहरूंचे गुण आपण आवर्जून जोपासले पाहिजेत.

आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची आवड भारतात निर्माण करण्याचे प्रयत्न नेहरूंनी केले. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यवहारांत शांतता, सदिच्छा आणि समजुतदारपणा यांच्यावर भर दिला. टिळकांनी आणि गांधींनी भारतीयांची अनेक बंधनांतून व भयातून मुक्तता केली. नेहरूंनी भारतीयांच्या कार्यक्षेत्राला नवी दिशा दाखविली, नवे ध्येय पुढे ठेवले.

भारताच्या नागरिकांनी पंडितजींचा वारसा प्रामाणिकपणे चालविला म्हणजे त्यांच्या ऋणातून मुक्त होता येईल आणि मगच पंडितजींच्या आत्म्याला समाधान वाटेल.

अशा या भारताच्या थोर सुपुत्राची जयंती आपण साजरी करायला घेतली आणि दुर्दैवाने त्याच्या खाली त्यांची पुण्यतिथी साजरी करणे नशिबी आले.

## अभ्यास

(१) महाप्रतापी जालंधर देवांकडून कसा मारला गेला. ?

(२) त्रिपुरी पौर्णिमेला (महादेवाच्या देवळावर) दिव्यांची रोषणाई का करतात.

(३) कॉंग्रेसमध्ये पंडितजींनी कोणकोणते नवे दृष्टिकोन आणले ?

BVBK-0401544